# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पांजरापोळ ते मुंबई (सीएसटी) नविन बांधण्यात आलेल्या पूर्व मुक्त मार्गाच्या दुरवस्थेबाबत**

**(१) ७१११७ (१६-०१-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर (मुंबई) येथील पांजरापोळ ते मुंबई (सीएसटी) या नविन बांधण्यात आलेल्या फ्री वेच्या (ईस्टर्न एक्सप्रेस हायवे) दुरवस्थेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २० जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फ्री वे (ईस्टर्न एक्सप्रेस हायवे) वर गेली अनेक दिवसांपासून खडडे पडलेले आहेत तसेच आजुबाजुला पाणी जाण्यासाठी कोणतीच सुविधा नसल्याने पाण्याचा निचरा होत नाही आहे तसेच बोगदयांमधील दिवे बंद अवस्थेत असून झोपडपटटीचे सांडपाणी पडून बोगदयाची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे काय आहे,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पूर्व मुक्त मार्गाच्या दुरुस्तीसीठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) सदर फ्री वे (पूर्व मुक्त मार्ग) डागडुजी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ३०.१०.२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले होते.

(२), (३) व (४) सदर मुक्त मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस मे, २०१५ च्या दरम्यान हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर मार्गावरील खड्डयांची दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असून, पांजरापोळ ते भक्तीपार्क पर्यंतचे सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याचा काही पृष्ठभाग झिजला असून, तो तोडून नवीन काँक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर मार्गावर आवश्यक ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिनी बांधण्यात आली आहे.

तसेच, सदर मार्गावरील बोगद्यामधील लाईट महानगरपालिकेमार्फत दुरुस्त करण्यात आली आहे.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेकडे आपतकालिन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत

**(२) ७८५१६ (२१-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात ११ मजली आणि त्याहून अधिक उंच इमारतींना बांधकाम परवाना देण्यात येत असतांनाही आपतकालिन परिस्थितीचा सामना करण्यासाठी मात्र महानगरपालिकेकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १६ मिटर उंच इमारतीपर्यत अग्निशमन दलाच्या जवानांना पोहचविणारी टर्न टेबल लॅडर हे अद्ययावत वाहन महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे २४ मिटर उंचीपर्यंतच्या इमारतीसाठी आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्याबाबतची आवश्यक साधनसामग्री उपलब्ध आहे. तथापि, कोल्हापूर शहरात ३५ मीटर उंचीच्या व ११ मजल्यापर्यंतच्या इमारतींना बांधकाम परवानगी देण्यात आली असून त्यासाठी आवश्यक ती आपत्कालीन साधनसामग्री अग्निशमन विभागाकडे उपलब्ध नाही.

(२) कोल्हापूर महानगरपलिकेच्या अग्निशमन विभागाला अद्यावत टर्न टेबल लॅडर हे वाहन उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाकडून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वाहनाच्या तांत्रिक तपशिलाबाबतची तपासणी सुरू असुन त्यांच्या तांत्रिक मान्यतेनंतर याबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत बेस्ट उपक्रमाच्या वाहतुक विभागाला १० हजार कोटींचे नुकसान झाल्याबाबत**

**(३) ९४९२५ (२१-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरु असलेल्या बेस्ट सेवेला सन २०१२ ते २०१६ या कालावधीत १० हजार कोटींचा तोटा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील बेस्ट बस सेवा ही लोकल रेल्वे नंतरची दुसरी वाहिनी समजली जात असून मुंबई शहर, मुंबई उपनगरे तसेच ठाणे, नवी मुंबई पर्यंतच्या प्रवाशांना बेस्टमार्फत सेवा पुरविली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेस्टला होणारे नुकसान कमी करून प्रवाशांना चांगली सेवा देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) सन २०१२ ते सन २०१६ या कालावधीमध्ये बेस्ट उपक्रमाच्या वाहतुक विभागाला एकूण रु. ३७१२.९० कोटी इतका तोटा झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बेस्ट उपक्रमाच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत तसेच लगतच्या नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर या शहरांमधील काही प्रमुख भागांमध्ये बससेवा प्रवर्तित करण्यात येते.

(३) व (४) बेस्टला होणारे नुकसान कमी करुन प्रवाशांना चांगली सेवा देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• वाहतुकीच्या साधानांमध्ये होणारे बदल विचारात घेऊन बेस्ट प्रवर्तनामध्ये लवचिकता आणण्याचे बेस्ट प्रशासनाचे धोरण आहे.

• मुंबईतील पर्यायी वाहतुकीच्या साधनांची स्थिती व प्रवाशांच्या बदलत्या आवडी, प्राधान्यक्रम विचारात घेऊन भविष्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने मिनी आणि मिडी तसेच वातानुकूलित बसगाडयांचा समावेश उपक्रमाच्या बसताफ्यात भाडे तत्वावर करण्याचे नियोजित आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता बेस्ट प्रशासन प्रयत्नशील आहे.

---

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासकांना परवानगी दिली असून ३३ विकासकांनी १२ हजार चौ. मी. क्षेत्रफळ म्हाडाला दिले नसल्याबाबत**

**(४) ९४९५९ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासकांना परवानगी दिली असून त्यांनी या इमारतीमधील काही सदनिका म्हाडाला देणे अपेक्षित होते परंतु इमारतींची बांधकामे पूर्ण झाल्यानंतही ३३ विकासकांनी १२ हजार चौ. मी. क्षेत्रफळ म्हाडाला दिले नसल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने सदर विकासकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (३०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी अशा एकूण ३३ प्रकरणांपैकी २९ प्रकरणांमध्ये माहे जुन, जुलै व ऑगस्ट २०११ या कालावधीमध्ये संबंधित पोलीस ठाण्यात विकासकांविरुध्द एफआयआर दाखल करुन, गुन्हे नोंदविलेले आहेत. तद्नंतर सर्व प्रकरणे गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आली आहेत. उर्वरित ०४ प्रकरणी एफआयआर दाखल केलेला नाही कारण यापैकी दोन प्रकरणी विक्रीची बिल्डींग / नविन इमारत पूर्ण झालेली नव्हती, एका प्रकरणांमध्ये याचिका क्र.२७९५/२०१० मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. तर राहिलेल्या एका प्रकरणांत मालमत्ताधारक / विकासक यांनी मंडळास अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केलेले आहे.

सदर २९ प्रकरणांपैकी ०८ प्रकरणांमध्ये शासनाने दि.१५.१०.२०१२ रोजीच्या पत्राव्दारे कळविल्यानुसार, विकासकाने म्हाडास एकूण ७५०.३५ चौ.मी. ऐवजी ७६०.०३ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले आहे. तसेच दंडात्मक रक्कमेपोटी एकूण १,७३,८४,००७/- इतक्या रक्कमेचा भरणा केलेला आहे.

उर्वरीत २१ प्रकरणांमध्ये म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ १०२२९.२२ चौ.मी. इतके आहे, त्यापैकी विकासकाने ५४०९.०४ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द केले आहे व ४८२०.१८ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द करावयाचे आहे.

सदर २१ प्रकरणांमध्ये मे २०१८ पर्यंत दंडात्मक रक्कम रुपये ४७,७०,७३,८९८/- इतकी आहे. त्यापैकी विकासकांनी ८,०६,०९,१११/- इतकी रक्कम म्हाडास भरणा केली आहे व उर्वरित रक्कम रुपये ३९,६४,६४,७८७/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

आर्थिक गुन्हे विभागाने ज्या विकासकांनी मंडळास अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाही. तसेच दंडात्मक रक्कम भरली नाही. अशा मालक / विकासकांविरुध्द मेट्रोपोलिटएन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

ज्या विकासकांनी अद्यापपर्यंत अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास सुपूर्द केले नाही. तसेच दंडात्मक रक्कम भरलेली नाही, अशा मालक / विकासकाच्या मालमत्तेबाबतची माहिती विविध विभागांकडून जसे की जिल्हाधिकारी (मुंबई शहर / उपनगर / ठाणे), उपनिबंधक (शहर) व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्याकडून माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती प्राप्त

होताच त्याची मालमत्ता जप्त करण्यासाठी जिल्हाधिकारी (शहर), यांना म्हाडाकडून कळविण्यात येईल व त्यातून प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास येणारी रक्कम वसुल करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयात खरेदी करण्यात आलेल्या एलईडी लाईटच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५) १०१०५६ (०३-०१-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांतील ऑपरेशन थिएटरमध्ये वापरण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या एलईडी लाईटच्या कंत्राट कामात चुकीची कागदपत्रे देऊन महानगरपालिकेची फसवणूक करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१८) :** (१) सदर कंत्राट कामात चुकीची कागदपत्रे देऊन फसवणूक करण्यात आली हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये दिनांक ३१.०३.२०१८ रोजी चर्चा झाली होती व स्थायी समिती अध्यक्षांनी यामध्ये तथ्य नसल्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत कंत्राटदाराविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून २९०, २९२, शेख मेनन स्ट्रीट, मुंबई-२ या ठिकाणी १०D-CC देण्यात येऊन मॉल बांधण्यात आल्याबाबत**

**(६) १०१७५७ (१२-०२-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून २९०,२९२, शेख मेनन स्ट्रीट, मुंबई-२ या ठिकाणी १०D-CC देण्यात येऊन मॉल बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामात नियमांचे उल्लंघन केले आहे किंवा नाही यासंदर्भात सी वॉर्डने सर्व्हेक्षण केले आहे काय,

(३) असल्यास, मंजुर आराखडयाप्रमाणे काम करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, सी वॉर्ड ने नियमांच्या उल्लंघना संदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०९-२०१८) :** (१) शेख मेनन स्ट्रीट, मुंबई येथील २९०,२९२ या अनिवासी इमारतीस दिनांक १६.०८.२०१४ व दिनांक ०१.०१.२०१५ रोजी संपूर्ण इमारत दुरुस्तीसाठी परवानगी देण्यात आली होती.

सदर दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर दिनांक २७.१०.२०१५ रोजी सदर इमारतीस कार्यपूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२) सदर बांधकामात नियमांचे उल्लंघनाबाबत महानगरपालिकेच्या सी विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले होते.
(३) सदर इमारतीचे काम मंजूर आराखडयानुसार करण्यात आले नव्हते.
(४) सदर इमारतीच्या बांधकामात नियमांचे उल्लंघन केल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर, सदर इमारतीवर महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ए अन्वये कारवाई करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये ३५०० एमडीआर क्षयरुग्ण असून २५०० रुग्णांनाच पोषण आहार मिळत असल्याबाबत**

**(७) १०६११५ (१९-०४-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये ३५०० एमडीआर क्षयरुग्ण असून त्यातील २५०० रुग्णांनाच पोषण आहार मिळत असल्याची माहिती महानगरपालिकेच्या एका अधिका-याने दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०९-२०१८) :** (१) ते (३) सेंट्रल टि.बी. डिव्हीजनच्या सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग वितरण कार्यक्रमांतर्गत सन २०१७ पर्यंत रुग्णांना पोषक आहार देण्याबाबतची तरतूद महानगरपालिकेकडे उपलब्ध नव्हती.

तथापि सन २०१६-१७ मध्ये मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेमार्फत शहर क्षयरोग अधिकारी व काही जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या प्रयत्नातून एन.जी.ओ. व सी.एस.आर.

माध्यमातून एमडीआर/एक्सडीआर रुग्णांकरिता पोषक आहाराची व्यवस्था करण्यात आली होती. या व्यवस्थेतून २५०० एमडीआर रुग्णांना विविध सेवाभावी संस्था/दाता/विश्वस्त संस्था यांच्यामार्फत वेगवेगळया पध्दतीने रेशन देण्यात आले होते.

तसेच, राष्ट्रीय आरोग्य मिशन मार्फत सर्व एमडीआर/एक्सडीआर रुग्णांना फेब्रुवारी, २०१८ पासून मुंबईतील साधारणत: ७००० रुग्णांना पोषक आहार म्हणून रेशन देण्यात येत आहे.

---

**मुंबई उपनगरातील मालाड-गोरेगांव (पूर्व) येथून वाहणा-या वालभट्ट नदीच्या मुखाशी दिंडोशीच्या डोंगरावर आग लागून वनसंपत्तीचे नुकसान झाल्याबाबत**

**(८) १०६१४५ (१८-०४-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड-गोरेगांव (पूर्व) येथून वाहणा-या वालभट्ट नदीच्या मुखाशी दिंडोशीच्या डोंगरावर दिनांक ७ जानेवारी,२०१८ रोजी वा त्या सुमारास आग लागून वनसंपत्तीचे नुकसान झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगोदर माहे डिसेंबर, २०१७ मध्येही याच डोंगरावर आग लागून वन संपत्तीचे नुकसान झाल्याची घटना घडल्यानंतर स्थानिक नागरिकांनी वन संपत्तीचे वारंवार होणारे नुकसान याप्रकरणी मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार करुनही महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दखल न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आरे दुग्ध वसाहतीमध्येही वालभट्ट नदीच्या रुंदीकरणाच्या नावाखाली पर्यावरणाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन संपत्तीचे संवर्धन व संरक्षण व्हावे यासाठी महानगरपालिकेने कोणत्या पर्यायी उपाययोजना केल्या आहेत व आगी लावणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) मालाड-गोरेगांव (पूर्व) येथून वाहणाऱ्या वालभट्ट नदीच्या मुखाशी दिंडोशीच्या डोंगरावर दिनांक ०३.०१.२०१८ रोजी आग लागली असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी सदर डोंगरावर आग लागल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्यावर, महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत सदर आग विझविण्यात आली.

तद्नंतर सदर ठिकाणी स्थानिक नागरिकांकडून वन संपत्तीचे वारंवार नुकसान होत असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) आरे वसाहतीमधून वाहणाऱ्या वालभट्ट नदीच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले आहे.

सदर कामाकरिता संबंधित प्राधिकरणांची परवानगी घेण्याची कार्यवाही सुरु असून, नाल्याच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम करतांना पर्यावरणाची हानी तसेच वनसंपत्तीचे कोणतेही नुकसान होणार नाही याबाबतची दक्षता महानगरपालिकेमार्फत घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथील निसर्ग उद्यानामागील मिठी नदीत मोठया प्रमाणावर बेकायदेशीरपणे डेब्रीजचा भराव करण्यात येत असल्याबाबत**

**(९) १०६१६८ (१८-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) बस डेपोसमोरील महाराष्ट्र निसर्ग उद्यानामागील मिठी नदीच्या पात्रात डेब्रिजचा भराव टाकल्याने तिवरांची झाडे मोठ्या प्रमाणात नष्ट झाली असून नदीवाटे खाडीत जाणा-या पाण्याच्या मार्गात अडसर निर्माण होऊन पाणी आजुबाजुच्या लोकवस्तीमध्ये पसरते व त्यामुळे वस्तीतील नागरिकांनी या प्रकरणी डेब्रिज टाकणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी त्या परिसरात असलेल्या बीट मधील पोलीसांकडे व जी उत्तर विभागाचे घनकचरा खात्याचे कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने बेकायदा डब्रिज टाकणा-या ठेकेदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) सदर ठिकाणी डेब्रिज टाकणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी त्या परिसरात असलेल्या बीटमधील पोलीसांकडे केली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) • सदर ठिकाणी महाराष्ट्र निसर्ग उद्यानाचे सुरक्षा रक्षक तैनात असतात.

• सदर ठिकाणी डेब्रिज टाकू नये याकरिता देखरेखीकरिता महानगरपालिका कर्मचाऱ्यांची व मार्शलची सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत नेमणूक करण्यात आली आहे.

• तथापि सदर डेब्रिज मध्यरात्री किंवा पहाटेच्या दरम्यान टाकले जात असल्यामुळे सदर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्या ठेकेदारांचा शोध लागला नाही.
• याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला व निसर्ग उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत अवगत करण्यात आले आहे.
• तसेच, सदर ठिकाणी आर.सी.सी. भिंत बांधण्याबाबत एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणाला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात येणार आहे.

---

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्रशासनाच्या स्वप्नपूर्ती गृह प्रकल्पातील हप्ते थकविणा-या २०० पेक्षा जास्त ग्राहकांची घरे रद्द होणार असल्याबाबत**

**(१०) १०६२९४ (१९-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्रशासनाच्या स्वप्नपूर्ती गृह प्रकल्पातील हप्ते थकविणा-या २०० पेक्षा जास्त ग्राहकांची घरे रद्द होणार असून सदर गृहप्रकल्पात २५ ते ७५ हजार विलंब शुल्क न भरणा-या ग्राहकांचा समावेश असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विलंब शुल्क थकविणा-या संबंधित ग्राहकांनी सिडकोकडे विलंब शुल्क भरण्यासाठी मुदत मिळावी म्हणून मागणी केली असून सिडको प्रशासनाने एक महिन्याची मुदत वाढ देऊन दिनांक २ डिसेंबर, २०१७ ही अंतिम मुदत दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेवटच्या तारखेपर्यंत सिडको प्रशासनाच्या पणन २ विभागातील व्यवस्थापकांनी पैसे घेण्यास नकार दिल्यामुळे ग्राहकांना आपले घर गमविण्याची वेळ आली असून विलंब शुल्क न भरणा-या ग्राहकांनी घराच्या भरलेल्या हप्त्यांच्या एकूण रक्कमेच्या १० टक्के रक्कम सिडको वसूल करणार असून अनामत रक्कमही सिडको जप्त करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडकोच्या मनमानी कारभारामुळे ग्राहकांना पडणारा आर्थिक भूर्दंड माफ करण्याबाबत तसेच आपल्या हक्काचे घर मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सिडको महामंडळाने सेक्टर ३६, खारघर, नवी मुंबई येथे स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजना राबवून सदर योजनेत सहभागी झालेल्या अर्जदारांची दि.२९.११.२०१४ रोजी संगणकीय सोडत काढली होती. सदर योजनेच्या वाटप पत्रानुसार संपूर्ण रकमेचा ६ समान हप्त्यात भरणा करण्याकरीता वाटपपत्रात नमूद करण्या आलेल्या वेळापत्रकानुसार मुदत देण्यात आली होती.

तथापि, वाटप पत्रातील विहित मुदतीनंतर शिल्लक रकमेचा भरणा करण्यासाठी ग्राहकांनी केलेल्या विनंतीनुसार सिडको संचालक मंडळाने प्रथम दि.२३.९.२०१६ रोजी ठराव क्र.११७१३ अन्वये करुन दि.२८.१२.२०१६ पर्यंत शिल्लक रकमेचा विलंब शुल्कासह भरणा करण्यासाठी पहिली मुदतवाढ दिली होती.

त्यानंतर ग्राहकांनी वेळोवेळी केलेल्या विनंतीनुसार संचालक मंडळाने शिल्लक रकमेचा भरणा विलंब शुल्कासह करण्यासाठी अनुक्रमे दि.३०.४.२०१७ पर्यंत व दि.२.१२.२०१७ पर्यंत दुसरी व तिसरी मुदतवाढ दिली होती. सदर मुदतवाढीबाबत पत्रव्यवहाराद्वारे कळविण्यात येवून वर्तमानपत्रात वेळोवेळी जाहिरातही प्रसिध्द करण्यात आली होती. त्याचप्रमाणे ज्या ग्राहकांना विलंब शुल्काची रक्कम कळविण्यात आली नव्हती अथवा मुदतवाढीबाबत चुकीच्या पत्त्यावर कळविण्यात आले होते अशा एकूण ८१ ग्राहकांना संपूर्ण रकमेचा भरणा करण्याकरीता पुन्हा दि.६.२.२०१८ ते दि.६.३.२०१८ पर्यंतचा कालावधी देण्यात आलेला होता तसेच वर्तमानपत्रातील जाहिरात व सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून कळविण्यात आले होते.

तथापि, त्या वाढीव मुदतीतही अर्जदाराने शिल्लक रकमेचा भरणा विलंब शुल्कासह न केल्याने सिडकोचे प्रचलित धोरण व नवी मुंबइ जमिन विनियोग (सुधारीत) विनियमातील तरतुदीनुसार अशा थकीत ग्राहकांची अनामत रक्कम व भरलेल्या हप्त्यांच्या रकमेतून १० टक्के रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच, थकीत अर्जदारांची घरे प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोखिवरे (ता.वसई,जि.पालघर) येथील आदिवासींच्या मालकी जागेवर अनधिकृत बहुमजली इमारती उभारल्याबाबत**

**(११) १०७२९७ (१९-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोखिवरे (ता.वसई,जि.पालघर) येथील आदिवासींच्या मालकी असलेल्या जागेवर सर्व्हे क्र. १२७ हिस्सा नं. ३ व १ (पै) अ या जागेवर १० ते १२ अनधिकृत बहुमजली इमारती कोणतीही परवानगी न घेता उभारल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.जितेंद्र शिंदे यांनी पालिका आयुक्त, वसई यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार करुन, आदिवासींची जागा मोकळी करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१) सर्व्हे क्र. १२७ हिस्सा नं. ३ व १ (पै) अ वर एकूण ६ पूर्ण इमारती (G+४ च्या चार इमारती, G+३ ची एक इमारत व G+१ ची एक इमारत) व एका इमारतीच्या प्लिंथचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) खरे आहे.
श्री.जितेंद्र शिंदे यांनी आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडे सदर अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करुन व्यावसायीकांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (MRTP) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करुन नागरीकांचे नुकसान टाळावे अशा स्वरूपाचा तक्रार अर्ज दिनांक ०५.१०.२०१७ रोजी केला आहे.
(३) व (४) वसई-विरार शहर महानगरपालिकेने सदर बांधकामाचे विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ५२, ५३, ५४ अन्वये नोटिस देऊन दिनांक २०.०५.२०१६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
सदर प्रकरणी विकासकाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विरोधात दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, वसई येथे केलेल्या दाव्यामध्ये उक्त अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई संदर्भात दिनांक ३०.११.२०१५ रोजी संबंधित न्यायालयाने मनाई हुकुम दिला आहे.
तसेच वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत दिनांक १९.१२.२०१६ रोजी G+३ इमारतीच्या एका विंगवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.
सदर मनाई हुकूम उठविण्याचे प्रयत्न वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.

---

**नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अभियंत्याकडून शहरातील टेरेसवर चालणारी हॉटेल्सची पहाणी करण्याबाबत**

**(१२) १०७६२० (१८-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कमला मिल परिसरातील हॉटेलला लागलेल्या आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अभियंत्याकडून शहरातील टेरेसवर चालणारी हॉटेल्सची पहाणी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगररचना विभागाच्या अभियंत्याकडून पाहणी केलेल्या सर्व्हेक्षणातून किती हॉटेल अनधिकृतपणे टेरेसवर चालविण्यात येत आहेत,
(३) असल्यास, या हॉटेलवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय.
(२) नाशिक महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत ३८ हॉटेल्स अनधिकृतपणे टेरेसवर चालविण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.
(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करणेकामी महानगरपालिकेमार्फत संबंधितांना अंतिम नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांचे भाडे कमी करण्याबाबत

**(१३) १०८०३४ (०३-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांचे क्रीडा स्पर्धांच्या वापराकरिता आकारण्यात येणारे भाडे हे अधिक प्रमाणात वाढविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विलेपार्ले (पूर्व) येथील नवीनचंद्र पोपटलाल कपाडिया ठक्कर विद्या मंदिर या शाळेमार्फत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धांसाठी तेथील असलेल्या महानगरपालिकेच्या दुभाषी मैदानाच्या वापराकरिता महानगरपालिकेकडून तब्बल एका दिवसाकरिता सुमारे २७ हजार रुपये इतके भाडे आकरण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वी याच मैदानाच्या वापराकरिता एक दिवसासाठी केवळ हजार रुपये भाडे आकारण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे स्थानिक संस्थांकडून क्रीडा स्पर्धांचे आयोजन अधिकाधिक होण्यासाठी तसेच राज्यातील खेळाडूंना प्रात्साहन मिळण्यासाठी महानगरपलिकेमार्फत वाढविण्यात आलेले मैदानाचे भाडे कमी करण्याकरिता शासन महानगरपालिकेला निर्देश देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१), (२) व (३) मुंबईतील विविध ठिकाणी असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांचे क्रिडा स्पर्धेच्या वापराकरिता महानगरपालिकेच्या दिनांक १८.०३.२०१३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे एक दिवसासाठी रु. १०००/- इतके भाडे आकारले जात होते.

तथापि, महानगरपालिकेच्या दिनांक ०२.११.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार, सदर मैदानांच्या वापराकरिता एक दिवसासाठी रु. २७,०००/- इतके भाडे आकारणी करण्यात येत होती.

(४) क्रिडा स्पर्धेचे आयोजन वाढविण्यासाठी व राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सदर परिपत्रकात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारणा करण्यात आली असून, दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, दिनांक १८.०३.२०१३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे, महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांवर क्रिडा स्पर्धेच्या वापराकरिता एक दिवसासाठी रु. १०००/- इतके भाडे आकारणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरामध्ये रेल्वे दीडशे मीटर, धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संकुल, मंडयांच्या शंभर मीटर परिसरात फेरीवाल्यांना मज्जाव करण्यात आला असल्याबाबत**

**(१४) १०८१११ (१८-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २००९ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, रेल्वे दीडशे मीटर, धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संकुल, मंडयांच्या शंभर मीटर परिसरात फेरीवाल्यांना मज्जाव करण्यात आला होता, तथापि तोच आदेश मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास कायम ठेवला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कायमस्वरुपी फेरीवाले व खाउगाडयांना बंदी करणेबाबत तसेच कारवाई करण्यामध्ये कुचराई करणा-या महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरापर्यंत ना-फेरीवाला क्षेत्राचा फलक लावण्यात आलेले आहेत.

---

## मुंबईत महानगरपालिकेने सुरु केलेल्या विविध प्रकल्पांबाबत

**(१५) १०९५३५ (१२-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरामधील रहिवाश्यांना २४ तास पाणी पुरवठा करण्याची योजना, महानगरपालिकेच्या विविध भाषांच्या शाळा सुरळीत चालविण्याच्या योजना, महानगरपालिकेच्या जागेवर उद्यान व विविध ठिकाणच्या समाज मंदिराचे व्यवस्थापन, मुंबईकरांचे आरोग्य राखण्यासाठी प्रत्येक प्रभाग स्थरावर सुसज्ज व सर्व सुविधा युक्त रुग्णालय उभारणे, काही रुग्णालये अद्यावत करणे या व अशा अनेक योजना मुंबई महानगरपालिका राबबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेतर्फे सुरु केलेले अनेक प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या विविध बँकामधील ठेवीमध्ये वाढ झाली असून मुंबई महानगरपालिकेचे विविध बँकामध्ये तब्बल ६५ हजार ९१३ कोटी रुपये मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेने मुंबईकरांच्या सोयीसाठी सुरु केलेल्या योजनांची कामे लवकरात लवकर पूर्ण होऊन मुंबईकरांना त्याचा लाभ व्हावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेची दिनांक ३१.०८.२०१७ रोजी मुदत ठेवीतील गुंतवणूक रु. ६५,९१३ कोटी इतकी असून, दिनांक ३०.०४.२०१८ पर्यंत सदर गुंतवणूक रु. ७३,०४३ कोटी इतकी आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांना २४ तास पाणी पुरवठा करण्याच्या उद्देशाने "मुंबई जलवितरण सुधारणा कार्यक्रम" प्रकल्पासाठी महानगरपालिकेमार्फत सेवा सल्लागाराची नेमणूक करुन कामास सुरुवात करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, इंग्रजी, तेलगू, तामिळ व कन्नड अशा आठ माध्यमाच्या मुंबई पब्लिक स्कूलसह १०३८ प्राथमिक शाळांतील २,६६,०२२ विद्यार्थ्यांना १०,१०२ शिक्षकांमार्फत मोफत शिक्षणाबरोबरच संगीत, चित्रकला, हस्तकला तसेच शारीरिक शिक्षणही दिले जाते. तसेच, २०१५-१६ पासून महापालिका शाळेतील ८ वी च्या विद्यार्थ्यांना टॅब देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील २२९ उद्याने, ४३२ मनोरंजन उद्याने, ३१९ मैदाने इत्यादींचा विकास, दर्जोन्नती व परिरक्षणा याकरिता पुरेशा निधीची तरतूद उपलब्ध आहे.

मुंबईकरांचे आरोग्य राखण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालयांतील रुग्णांना २४ X ७ वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. तसेच, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी वैद्यकीय समाजसेवक (MSW) यांचेमार्फत धर्मादाय संस्था यांचेकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील ३६ इमारतींकडे महानगरपालिकेचा 'निवासी दाखला' (ओसी) नसल्याबाबत**

**(१६) १०९६५२ (०३-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना विद्यापीठातील सन १९७५-२००८ या कालावधीत बांधलेल्या ६१ पैकी ३६ इमारतींकडे महानगरपालिकेचा 'निवासी दाखला' (ओसी) नसल्याची माहिती निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठातील उक्त ओसी नसलेल्या ३६ इमारतींच्या बांधकामास जबाबदार असणारे विद्यापीठ व्यवस्थापन, विकासक, वास्तूविशारद यांचेविरुध्द शासन तथा महानगरपालिकेतर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, इमारतीचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार पूर्ण झाल्यावर रहिवाशांना नव्या इमारतीत सुरक्षितता मिळण्याच्या दृष्टीने नव्या घरांचा ताबा देताना 'निवासी दाखल्याची' सक्ती करणे तसेच 'निवासी दाखला' न घेता रहिवाशांना बेकायदा घरांचा ताबा देणा-या (पझेशन) विकासकाविरुध्द कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१८) :** (१) मुंबई विद्यापीठाच्या मालकीच्या कलिना येथील सुमारे ९.८४ लाख चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाच्या भूखंडावर विविध इमारतींचे बांधकाम करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सन १९७५ ते २००८ या कालावधीत ६९ प्रस्ताव प्राप्त झाले.

त्यापैकी, ६३ इमारत बांधकामांचे प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आले. सदर ६३ इमारतींपैकी एकूण १९ इमारतींना पूर्ण व ३ इमारतींना अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

उर्वरित ४१ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखानुसार, कलिना येथील भूखंडावरील इमारती खाजगी विकासकाने विकसित केल्याची नोंद नाही.

कलिना येथील भूखंडावरील इमारती शैक्षणिक वापरासाठी उपयोगात येत असल्याने व कोणताही वाणिज्य तथा व्यापारी हेतू नसल्याने, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या मानवतावादी दृष्टीकोनातून भोगावटा प्रमाणपत्र देण्यात न आलेल्या ४१ इमारतींवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आलेली नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाकोला ब्रीज (सातांकुझ-मुंबई) येथील महानगरपालिका मराठी माध्यमिक शाळेच्या इमारतीबाबत**

**(१७) १११४५२ (०३-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकोला ब्रीज (सातांकुझ-मुंबई) येथील महानगरपालिका मराठी माध्यमिक शाळेची इमारत मागील आठ वर्षापूर्वी पाडून अदयापही इमारतीच्या बांधकामास सुरुवात झालेली नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

तदनुसार उक्त शाळेच्या इमारतीचे बांधकाम तात्काळ होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सांताक्रुझ (पूर्व) येथील वाकोला मनपा शाळा तळमजला + ३ मजले असलेल्या अ व ब या दोन विंग व तळमजला + ४ मजले असलेल्या क व ड या दोन विंग अशी चार भागांची होती.

त्यापैकी क व ड विंगची मोठी दुरुस्ती सन २०१५ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आली आहे.

सदर शाळेच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या पाहणीनुसार, अ व ब विंग धोकादायक असल्याने सन २०११ मध्ये सदर विंगचे निष्कासन करण्यात आले असून, सदर इमारतीच्या अ व ब विंगच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावास डिसेंबर, २०१७ मध्ये मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर शालेय इमारतीच्या अ व ब विंगच्या पुनर्बांधणीचे काम निविदा मागवून हाती घेण्यात येणार आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या १६ मराठी व अन्य भाषिक शाळा पटसंख्या कमी असल्याचे कारण देऊन बंद करण्यात येणार असल्याबाबत**

**(१८) ११२१०९ (१९-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या १६ मराठी व अन्य भाषिक शाळा पटसंख्या कमी असल्याचे कारण देऊन बंद करण्यात येणार असल्याचे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ७ मराठी आणि इतर भाषेच्या ४ शाळाही विलीन करण्याचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बंद होणा-या शाळेतच मराठी भाषा प्रगल्भ करण्याबाबत व पहिलीपासूनच इंग्रजी शिकविण्यास सुरुवात करुन बंद अवस्थेत असलेल्या शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शून्य पटसंख्येच्या शाळा अन्य महापालिका शाळेत विलिन करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(२) यामध्ये मराठी माध्यमाच्या ११ शाळा व इतर माध्यमाच्या १५ शाळा विलीन करण्याचा प्रस्ताव आहे.

(३) व (४) इंग्रजी व्यतिरिक्त मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी, तामिळ, तेलगू व कन्नड या समांतर माध्यमांच्या शाळा भविष्यात पटसंख्येअभावी बंद पडू नयेत व त्यांची पटसंख्या टिकून रहावी हा दृष्टीकोन ठेवून समांतर माध्यमांचे प्रथम भाषेसोबतच इंग्रजी भाषा प्रथम भाषेचे अध्यापन इयत्ता १ ली पासून बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये सन २०१८-१९ पासून सुरु केले आहे.

महानगरपालिकेच्या ज्या शाळा पटसंख्येच्या कारणास्तव विलीन करण्यासाठी प्रस्तावित आहेत त्या शाळांचे विलीनीकरण त्या माध्यमाच्या जवळच्या शाळांमध्ये करण्यात येत आहे.

भविष्यात ज्या परिसरात शाळेची मागणी प्राप्त होईल त्या परिसरातील मागणीनुसार त्या शाळा खोल्यांमध्ये मागणीनुसारच्या माध्यमाची शाळा सुरु करण्यात येणार आहे.

---

**नांदेड जिल्हयातील सिडको -हडको भागात १० ते १२ दिवस पाणी पुरवठा केला जात असल्याबाबत**

**(१९) ११२५९१ (१२-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील सिडको -हडको भागात मागील पाच ते सहा महिन्यांपासून (सन २०१७) प्रति महिना सरासरी केवळ १० ते १२ दिवस पाणी पुरवठा केला जात असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाकडून हा भाग महानगरपालिकेत आल्यानंतर पाणी पुरवठा यंत्रणा जुनी पाईपलाईन अद्ययावत करण्यासाठी नियोजन व आवश्यक आर्थिक तरतुदी याबाबत अभ्यास आणि पाठपुरावा योग्य प्रकारे केला नसल्याने जुन्या पाईपलाईनमुळे अनेक ठिकाणी पाणी गळती होत असून कांही वेळा पंप मोटारही जळत असल्याने वारंवार पाणी पुरवठा खंडीत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मार्ट सिटी आणि डिजिटल प्रणालीकरिता प्रयत्नशील असलेल्या महानगरपालिकेचा पाणी पुरवठा विभाग मात्र आजुही नियोजन शुन्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) • सिडको भागात एक दिवस आड पाणी पुरवठा करण्यात येत असल्याने प्रति महिना १५ दिवस पाणी पुरवठा होत असतो.

• सिडको प्रशासनाकडून हा भाग नांदेड-वाघाळा महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर सन २०१४ साली JNNURM योजनेंतर्गत या भागासाठी ३५ एमएलडी क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. या व्यतिरिक्त २० व २५ लक्ष लीटर या क्षमतेचे दोन जलकुंभ बांधण्यात आले आहे.

• सिडको भागात ८४.४१ कि.मी. लांबीच्या मंजूर जल वाहिन्यांपैकी ५७.५० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

• सन २०१७ साली अमृत योजनेंतर्गत नांदेड शहरातील मंजूर पाणी पुरवठा योजनेतील १३२ कि.मी. लांबीच्या वितरण व्यवस्थेपैकी सिडको भागात ३५ कि.मी. लांबीची पाईपालाईन टाकण्यात येणार आहे. यापैकी २० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

(३) (४) व (५) • सिडको भागात पाणी पुरवठ्याबाबत योग्य ती उपाययोजना नांदेड-वाघाळा महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

---

## नाशिक शहरात तब्बल ३२३ इमारतींच्या बेसमेंट व टेरेसचा अनधिकृत वाणिज्य वापर सुरु असल्याबाबत

**(२०) ११२६४४ (१९-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात तब्बल ३२३ इमारतींच्या बेसमेंट व टेरेसचा अनधिकृत वाणिज्य वापर सुरु असून इमारतींच्या बेसमेंटमध्ये १०४ गोदामे, २५ हॉटेल्स, १०५ दुकाने व ४७ इतर वाणिज्य आस्थापना सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय

(२) असल्यास, अशा इमारतींनी भोगवटा प्रमाणपत्र देखील घेतलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार चौकशीत दोषी आढळून आलेल्या मिळकतींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय.

नाशिक महानगरपालिकेने राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत ३१० इमारतींच्या तपासणीत बेसमेंट व टेरेसमध्ये ९१ गोडावुन, ७१ हॉटेल्स, १२८ दुकाने व २६ इतर वाणिज्य वापर आढळून आलेला आहे.

(२) एकूण ४३ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

(३) अनधिकृत वाणिज्य वापर सुरु असलेल्या संबंधित इमारत धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद ) नगरपरिषदेने मागील दहा महिन्याच्या कालावधीमध्ये एक हजार पेक्षा जास्त विकास कामांना मंजुरी दिल्याबाबत

**(२१) ११२७८४ (१८-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषदेने मागील दहा महिन्याच्या कालावधीमध्ये एक हजार पेक्षा जास्त विकास कामांना मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषदेने मंजुर निधी व त्यांच्याकडे कर स्वरुपात जमा असलेल्या उपलब्ध निधी पेक्षा किती पटीने जास्त निधीची कामे मंजुर केली आहेत,
(३) असल्यास, सदरहु मंजूर केलेली विकास कामांची निविदा काढण्यासाठी शासनाचे कोणते निकष आहेत काय,
(४) असल्यास, सदरहु निकषाप्रमाणेच विकास कामांच्या निविदा उस्मानाबाद नगरपरिषदकडुन काढण्यात येत आहेत काय,
(५) असल्यास, कामांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचलनालय, मुंबई यांस लेखी पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाकडून याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) दि.०१ जून २०१७ ते दि.३१ मार्च, २०१८ या दहा महिन्यांच्या कालावधीमध्ये एकूण ७८२ विकास कामांच्या ठरावांना मंजूरी दिल्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(२) अंदाजित २ ते ३ पटीने जास्त निधीची कामे मंजूर केली असल्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) व (४) रु.३.०० लक्ष किंमतीच्या व त्यापुढील कामासाठी ई-टेंडरिंग पद्धतीने व रु.३.०० लक्ष किंमतीच्या आतील अंदाजपत्रकीय रकमेच्या कामांकरीता ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्याचे शासनाचे निकष आहेत. त्याप्रमाणे उस्मानाबाद नगरपरिषदेमार्फत निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९३ मधील तरतूदी, तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शन सूचना व नियमांस अनुसरुन विकास कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याबाबत मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी अहवाल सादर केला आहे.
(५) व (६) होय, याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अहवालात नमूद केले आहे.

---

**नवी मुंबईतील विशेष आर्थिक क्षेत्राचे एकात्मिक औद्योगिक क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याबाबत**

**(२२) ११३००९ (१९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील विशेष आर्थिक क्षेत्राचा एकात्मिक औद्योगिक क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याचा दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रीमंडळाने निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१८) :** (१) होय.
(२) मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस अनुसरुन शासनाने दि.१६.३.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यानुसार नवी मुंबई विशेष आर्थिक अधिसूचित क्षेत्राचा एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून विकास करताना सदर क्षेत्रातील जमिनीच्या अनुज्ञेय वापरात कोणताही बदल न करता ८५% औद्योगिक व १५% रहिवास वापर अनुज्ञेय करण्यात आला असून सदर क्षेत्राची अधिसूचना रद्द करुन प्रस्तुत क्षेत्रात बिगर एसईझेड औद्योगिक घटकांना मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सिडकोचे प्रचलित धोरण, कंपनी सोबतचे करारनामे, प्रस्तावित उद्योग विकास या बाबी तपासून निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीही गठित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूरला पाणी पुरवठा करणा-या इरई धरणात केवळ २८.८६ टक्के जलसाठा शिल्लक असल्याने तीव्र पाणी टंचाईस सामोरे जावे लागणार असल्याबाबत

**(२३) ११३०४५ (१४-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूरला पाणी पुरवठा करणा-या इरई धरणात केवळ २८.८६ टक्के जलसाठा शिल्लक असल्याने तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसा पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) • चंद्रपूर शहर पाणी पुरवठा योजनेचे “इरई धरण” व “इरई नदी” हे दोन स्त्रोत असून मुख्यत्वे शहराला इरई धरणातून पाणी पुरवठा होतो.
• मागील वर्षी अत्यल्प पावसामुळे इरई धरणातील खालावलेल्या पाण्याच्या चंद्रपूर शहरात काही प्रमाणात पाणी टंचाई होती, असा अहवाल चंद्रपूर महानगरपालिकेने सादर केला आहे.
(३) व (४) • चंद्रपूर शहराला पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी चंद्रपूर औष्णिक उर्जा प्रकल्पाचा पाणी पुरवठा मर्यादीत करण्याच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर नियोजन करण्यात आले.

• इरई नदीवर दाताळ येथे बंधारा बांधणे व चंद्रपूर म्हाडा येथून रामनगर जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत नव्याने पाईप लाईन टाकण्याची कार्यवाही चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

• शहरात पाणी पुरवठा योग्यरित्या करण्यासाठी इरई धरणातील विहिरीभोवती मातीचा बंधारा बांधून पंपाव्दारे मुख्य विहिरीत पाणी घेणे, शहरात नव्याने कुपनलिका व विंधनविहीरी बांधणे, शहरातील विहीरींची साफसफाई करुन त्यावर पंप बसविणे तसेच १ दिवस आड पाणी पुरवठा करणे इ. उपाययोजना करण्यात आल्याचे चंद्रपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**नायगाव बीडीडी चाळीतील ५ रहिवाशांनी बेस्टचे १२ लाखांहून अधिक रकमेचे बेस्टचे वीज थकविल्याबाबत**

**(२४) ११३६५४ (१४-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव बीडीडी चाळीतील ५ रहिवाशांनी बेस्टचे १२ लाखांहून अधिक रकमेचे बेस्टचे वीज मागील अनेक वर्षापासून थकविलेले असतांना त्याच्यांविरोधात कारवाई करण्यास बेस्ट प्रशासनाला अपयश आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज बील थकविणा-या ५ ग्राहकांकडून ७ वेळा वीजपुरवठा खंडित करण्याचा प्रयत्न केला असता सातत्याने राजीय दबाव येत असल्याने वीज बील वसूल करणे शक्य होत नसल्याचा थेट आरोप बेस्ट प्रशासनाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पोलिस संरक्षणात वीज खंडित करण्याचा प्रयत्नही राजकीय दबावाखाली हाणून पाडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती सदरहू वीज बिलाची रक्कम त्वरित वसुल होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) नायगांव बीडीडी चाळ क्रमांक १३ येथील ५ वीजग्राहकांची माहे मे, २०१८ पर्यंत रु. ११.७५ लाख इतकी थकीत रक्कम असल्याचे बेस्ट उपक्रमामार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर वीजग्राहकांची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी माहे मार्च २०१४ ते माहे मार्च २०१७ या कालावधीत बेस्ट उपक्रमामार्फत एकूण ८ वेळा वीज पुरवठा खंडीत करण्यासाठी कारवाई आयोजित करण्यात आली होती.

तथापि आयोजित केलेल्या संयुक्त मोहिमेत अॅट्रॉसिटीचे भय दाखवून, शिवीगाळ व धमकी तर कधी स्थानिक लोकांचा जमाव एकत्र करुन वीज पुरवठा खंडीत करण्याच्या कारवाईस अटकाव करण्यात आला.

(३) दिनांक ३०.०३.२०१७ रोजी सुरक्षा बल व पोलीस यांच्या मदतीने सदर ५ वीज ग्राहकांवर कारवाईचे आयोजन केले असता, बेस्ट उपक्रमामार्फत सदर वीज ग्राहकांकडून थकीत वीज मूल्याच्या ५०% रकमेचे धनादेश घेऊन कारवाई स्थगित करण्यात आली.
(४) व (५) सदर ग्राहकांनी वीज देयकांचा भरणा केल्यामुळे, दिनांक १५.०२.२०१८ रोजी पोलीस संरक्षणात वीजमापके काढून बेस्ट उपक्रमामार्फत त्यांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला.

सदर ग्राहकांनी बेस्ट उपक्रमास केलेल्या विनंतीनुसार, त्यांना थकीत वीज बिलाच्या रकमेपैकी १/३ रक्कम तात्काळ व उर्वरित रकम ३ धनादेशाद्वारे भरावयास अनुमती देण्यात आली.

सदर ५ वीज ग्राहकांपैकी २ वीज ग्राहकांनी १/३ रकमेचा भरणा केल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा जोडण्यात आला. त्यापैकी एका ग्राहकाने दिलेल्या २ धनादेशाची रक्कम न वटल्यामुळे त्या ग्राहकावर कलम Negotiable Instrument Act, १३८ अन्वये कायदेशीर कारवाई सुरु असून, त्यांचा वीजमापक काढण्यात आला आहे.

---

**आंबेडकर नगर, महाराष्ट्र नगर, खेरवाडी येथे दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(२५) ११४४२७ (१२-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेडकर नगर, महाराष्ट्र नगर, खेरवाडी विभाग, बांद्रे (पूर्व) येथे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात दुषित पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुषित पाणीपुरवठयामुळे सदर परिसरात कावीळ, मलेरीया, डेंगू व टायफाईड अशा रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवाशांकडून प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुषित पाणीपुरवठा रोखण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१) आंबेडकर नगर व महाराष्ट्र नगर भागातील रहिवाशांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर परिसरात दुषित पाणी पुरवठयामुळे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात कावीळचे ३, गॅस्ट्रोचे ७ व टायफाईडच्या २ रुग्णांची नोंद महानगरपालिकेच्या एच/पूर्व विभागात करण्यात आली.
(३) सदर परिसरात होणारा दुषित पाणी पुरवठा रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे:-
• ज्ञानेश्वर नगर रोड आणि महाराष्ट्र नगर जंक्शन येथील जलवाहिनीवर आढळून आलेली गळती तात्काळ दुरुस्त करण्यात आली.

• खेरवाडी येथील कामवाल निवास परिसरातील अत्यंत जुनी व खोल १०० मिमी. व्यासाची जलवाहिनी खंडीत करुन पाणी पुरवठा अन्य जलवाहिनीवर स्थलांतरीत करण्यात आला.

सद्य:स्थितीत सदर परिसरामध्ये स्वच्छ पाणी पुरवठा होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२६) ११६०२३ (१२-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००७ नंतर मुंबई महानगरपालिकेने रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेची अंमलबजावणी सुरू केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात मात्र मागील १ वर्षाचा विचार करता या कालावधीत फक्त इमारत उभ्या राहिल्या आहेत त्यातील निम्या इमारतींनीही रेन वॉटर हार्वेस्टिंगकडे लक्ष दिले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेन वॉटर हार्वेस्टिंग योजनेकडे दुर्लक्ष करणाऱ्या विकासकाविरुद्ध महानगरपालिकेकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेकडून राबविण्यात येणा-या या योजनेची योग्य प्रमाणात अंमलबजावणी होण्याकरीता कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रेन वॉटर हार्वेस्टींग योजना दिनांक १ ऑक्टोबर, २००२ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) सदर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील नमूद सर्व भूखंडांकरिता वर्षा संचयन व विनियोग करणे सक्तीचे केले होते:-

• दिनांक १ ऑक्टोबर, २००२ पासून प्रथमत: नवीन विकासाकरिता येणाऱ्या १००० चौ. मीटर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असणारे सर्व भूखंड

• जे भूखंड दिनांक १ ऑक्टोबर, २००२ पूर्वी विकसित करण्यास घेतले होते परंतु दिनांक ०१.०९.२००३ नंतर निवासी प्रमाणपत्र/बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेण्यासाठी येथील असे भूखंड

• इमारतींमध्ये बदल करवून घेण्यासाठी किंवा उर्वरित चटई क्षेत्र इत्यादी वापरण्यासाठी येणारे भूखंड

• दिनांक ०६.०६.२००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार, ३०० चौ. मीटर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेले सर्व भूखंडांना विकासाकरिता

महानगरपालिकेमार्फत सदर अट आराखडा नामंजुरी सूचना पत्रात (आय.ओ.डी.) एक अट म्हणून टाकली जाते व सदर अटीचे पालन झाल्याबाबतची खात्री झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमृत योजनेनुसार महाराष्ट्रातील ४४ शहरांमध्ये पिण्याचे पाणी, मलनिःसारणाची सोय आणि हरित पट्टे तयार करण्याबाबत**

**(२७) ११७२९१ (२३-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने अमृत योजनेनुसार महाराष्ट्रातील ४४ शहरांना पिण्याचे पाणी, मलनिःसारणाची सोय आणि हरित पट्टे तयार करण्यासाठी माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पासून निधी देण्यास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेसाठी शासनाने कोणकोणती शहरे निवडली आहेत व सदर योजनेनुसार या शहरात या योजनेची अमंलबजावणी सुरु केली आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी केंद्र शासनाकडून माहे जून, २०१८ अखेर किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(४) असल्यास, या योजनच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान राज्यामध्ये सन २०१५ पासून राबविण्यात येत असून त्यामध्ये राज्यातील १ लक्षपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ४३ शहरे व विशेष बाब म्हणून शिर्डी या शहराचा समावेश आहे.

• सदर अभियानांतर्गत राज्य शासनाच्या रु.७७५७ कोटी किमंतीच्या आराखडयास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

• सदर आराखड्यानुसार राज्यामध्ये पाणीपुरवठा व मलनिस्सारण विषयक ६९ व हरित क्षेत्राचे एकूण १२८ असे एकूण १९७ प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

• त्यापैकी १८३ प्रकल्पांची कामे सुरु झालेली असून १४ प्रकल्पांची कामे निविदाधीन आहेत.

• अमृत अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आराखडयानुसार प्रथम हप्त्यापोटी केंद्र व राज्य शासनाचा मिळूण रु.१०६०.२५ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे.

• आतापर्यंत सदर योजनेवर रु.६२८ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

• सदर योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पांची कामे अभियान कालावधीमध्ये विहीत कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाची मंजूर पदे भरण्याबाबत**

**(२८) ११८६११ (२३-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता ४११ पदे मंजुर असुन त्यापैकी १६० पदे कार्यरत असल्यामुळे त्यांचा कामाचा अतिरीक्त ताण कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत असल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन विभागामधील कर्चाऱ्यांच्या कमतरतेमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरीक्त ताण पडत असुन शहरात एखाद्या वेळी अनेक ठिकाणी अनुचीत घटना घडल्यास कर्मचाऱ्यांना सेवा देण्यास अडचणीचे ठरू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहराचा वाढता विकास लक्षात घेता नागपूर महानगरपालिकेकरीता मंजुर असलेली अग्निशमन विभागाची मंजुर पदे भरण्यात आलेली आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) • नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील रिक्त पदांपैकी अग्निशमन केंद्र अधिकारी-०५, चालक यंत्रचालक-५७, फिटर कम ड्रायव्हर-०४ व इलेक्ट्रिशियन-०१, अशी एकूण ६७ पदांची भरती करण्याच्या अनुषंगाने भरती प्रकिया सुरु करण्यात आलेली आहे.

• तसेच प्रमुख अग्निशामक विमोचक, अग्निशामक विमोचक, मुख्य मेक्यानिक ड्रायव्हर, उप अग्निशमन अधिकारी या पदांच्या सेवाप्रवेश नियमातील त्रुट्या सुधारित करण्याची कार्यवाही सुरु असून, सेवाप्रवेश नियम सुधारित झाल्यानंतर, सदरची पदे विहित मार्गाने भरण्याबाबत कार्यवाही करण्याचे प्रयोजन असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

**नांदगांव नगरपरिषद (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे अग्निशमक केंद्रावर अग्निशमक दलाचे कर्मचारी व अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(२९) ११९९१९ (२३-०७-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव नगरपरिषद (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे अग्निशामक केंद्र व अग्निशमन वाहन उपलब्ध असतांनाही या केंद्रावर अग्निशमक दलाचे कर्मचारी व अधिका-यांच्या नियुक्ती अभावी नांदगांव शहर परिसरात आग लागल्यास नांदगांव नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राबाहेरील अन्य नगरपरिषदेंकडून अग्निशमन वाहन बोलावून आग विझवावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे, चौकशी अहवालानुसार नांदगांव नगरपरिषदेच्या अग्निशमक केंद्रावर अग्निशमक दलाचे कर्मचारी व अधिका-यांची सत्वर नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नांदगाव नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील अग्निशमन विभागातील मंजूर रिक्त पदे नियमानुसार आवश्यक कार्यवाही करुन तातडीने भरण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय योजनेतून 'एक अधिकारी, एक घर, एक राज्य' या नियमानुसार निवासस्थान देण्यासाठी नियमात बदल करण्यात आल्याबाबत**

**(३०) १२०९०१ (२५-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) 'एक अधिकारी, एक घर, एक राज्य' या नियमानुसार सरकारी योजनेतून निवासस्थान देण्यासाठी नियमात बदल करण्यास राज्य शासन तयार असल्याची माहिती महाअधिवक्ता यांनी मा. उच्च न्यायालयात दिली असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सनदी अधिकारी व न्यायाधीशांना संपूर्ण राज्यात शासकीय योजनेतून एक घर देण्यासाठी धोरण तयार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धोरण तयार करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०९-२०१८) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
मा. उच्च न्यायालयात श्री. केतन निरोडकर यांनी दाखल केलेल्या The Criminal PIL (stamp) २४/२०१७ या याचिकेच्या सुनावणी दरम्यान एक अधिकारी, एक घर, एक राज्य याबाबत मुद्दा उपस्थित झालेला असल्याचे मा. महाधिवक्ता यांनी दि. २१.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. या अनुषंगाने मा. महाधिवक्ता यांच्याकडून युक्तीवाद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरण अंतिम निर्णयार्थ न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील त्यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला शहर आणि जिल्हयात दुषित पाण्यामुळे आजार वाढत असल्याबाबत

**(३१) १२११३५ (२६-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेच्या दहा नागरी आरोग्य केंद्राकडून एकत्रित केल्या जाणा-या पाण्याच्या नमुन्यांमध्ये अकोला शहर आणि जिल्हयात दुषित पाण्यामुळे आजार वाढत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने डाबकी रोड, खैरमोहमद प्लॉट, मुकुंद नगर, मुकुंदवाडा या भागांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला शहर व जिल्हयातील नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अकोला शहरात पाणीपुरवठा करण्यापूर्वी पाण्याचे नमुने घेवून ते पिण्यायोग्य असल्याची खात्री केल्यानंतरच पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे दुषित पाणीपुरवठ्यामुळे आजार वाढत असल्याची बाब खरी नाही.

तसेच या भागातून पाण्यामुळे आजार पसरल्याची तक्रार अकोला महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही, असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

याशिवाय अकोला जिल्हयातील नगरपालिका/नगरपरिषदांमध्ये दूषीत पाण्यामुळे आजार वाढत असल्याची तक्रार प्राप्त नसल्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांच्या अहवालात नमूद आहे.

(२) सदर ठिकाणी पाणी पुरवठ्याचे दिवशी आरोग्य विभाग व जलप्रदाय विभागामार्फत संयुक्तीक नमुने घेतल्यानंतर त्याचा तपासणी अहवाल योग्य आला आहे.

(३) व (४) जलशुध्दीकरण केंद्र महान येथील पाण्याचे नमुने नियमितपणे तपासणी करुन ते पिण्यायोग्य आढल्यानंतर अकोला शहरामध्ये पाणी पुरवठा करण्यात येत आहे, असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

तसेच जिल्हयातील नगरपालिका/ नगरपरिषदांमध्येही नियमित व शुध्द पाणीपुरवठ्याची व्यवस्था असल्याचे, जिल्हाधिकारी अकोला यांच्या अहवालात नमूद आहे.

---

### अकोला महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(३२) १२११४१ (२५-०७-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचारी हे अत्यल्प वेतनावर काम करीत असून प्रस्तुत प्रकरणी शासनाचे मार्गदर्शन घेऊन निर्णय घेण्याचे

आश्वासन देण्यात येऊन देखील त्याची पुर्तता करण्यात येत नसल्याने महानगरपालिकेकडून समायोजन, इतर सेवा व महानगरपालिकेचे वेतन आदी मागण्यांची पूर्तता न केल्यास दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास काम बंद आंदोलनाचा इशारा सदर कर्मचा-यांनी महानगरपालिका प्रशासाकडे दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनामुळे हद्दवाढ भागातील पाणी पुरवठा विस्कळीत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्मचा-यांच्या मागण्यांची पुर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) अकोला महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीतील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) संबंधीत ग्रामपंचायतीमधील पात्र कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील समायोजनाची कार्यवाही महापालिका प्रशासनाकडून सुरु असल्याचे, आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

## लातूर शहरातील शासकीय कार्यालये व खाजगी संस्थांमध्ये अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसल्याबाबत

**(३३) १२१३५६ (२५-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर शहरात शाळा, महाविद्यालये, दवाखाने, पेट्रोलपंप, शासकीय कार्यालये, लॉजिंग, शासकीय व खाजगी वसतिगृहे आदी ठिकाणी अग्निशमन यंत्रणाच कार्यान्वित नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जनतेच्या जीविताच्या व मालमत्तेच्या संदर्भात असलेल्या या अत्यंत गंभीर बाबीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व शासन निर्णयानुसार वर्दळीच्या इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
• ज्या इमारतींमध्ये आग प्रतिबंधक ऊपाययोजना केलेल्या नाहीत अशा रुग्णालय, शासकिय,निमशासकिय,खाजगी आस्थापनांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक कायदा/ अधिनियम २००७/२००९ मधील कलम ६ व नियम ९(१) प्रमाणे महानगरपालिकेने नोटिसा दिलेल्या आहेत.

• विहित कालावधीमध्ये संबंधित आस्थापनांकडून उपाययोजना न झाल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार असल्याचे लातूर महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवलीतील (जि.ठाणे) रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची कामे**
**अत्यंत संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(३४) १२१८७३ (२९-०७-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवलीतील (जि.ठाणे) गत ५ वर्षे रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाची कामे अत्यंत संथ गतीने सुरु असून माहे एप्रिल अखेर कामे पूर्ण करण्याचे महासभेत निर्णय घेऊनसुद्धा सदर कामे अद्याप अपूर्णच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आधारवाडी चौकासारख्या भागातील खोदण्यात आलेल्या रस्त्याची फार दुरवस्था होऊन मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत आधारवाडी चौक ते गांधारी गाव रस्त्याची एकूण लांबी २३०० मी. पैकी आधारवाडी चौक ते गणपती चौकापर्यंत ९०० मी. लांबी व २४ मी. रूंदी आहे. तसेच गणपती चौक ते गांधारी पुलापर्यंत १४०० मी. लांबी व ३० मी. रूंदी विकास योजनेप्रमाणे आहे. या रस्त्याचे साईड ड्रेन, दुभाजक, फुटपाथ इत्यादी कामे ९५% पूर्ण करण्यात आलेली आहेत.
• या रस्त्याअंतर्गत श्री.अनंत भावे यांचे निवासस्थान रस्ता रूंदीकरणात बाधित होत असल्याने, सदरचे निवासस्थान निष्कासित करण्यात येऊ नये, याकरीता श्री. भावे यांनी सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ केले आहे.
• तद्‌नंतर सुमारे २२ वर्षानंतर, दि. १५ मे, २०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने महानगरपालिकेच्या बाजूने निकाल दिल्यानंतर श्री. भावे यांचे बाधित निवासस्थान निष्कासित करून सदर ठिकाणी महानगरपालिकेने रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू केले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) • आधारवाडी चौकामध्येच रस्त्यांच्या फॅनिंग भागामध्ये श्रीमती निर्मला विध्वंस व श्री. शाम फुलवडे यांचे रस्ता रूंदीकरणातील बाधीत बांधकामावर मा. न्यायालयाचे स्थगन आदेश आहेत. तसेच स्थानिक लोकांचा रूंदीकरणासाठी असलेला विरोध यामुळे या भागातील रस्त्याचे विकास योजनेनुसार २४ मी. रूंदीप्रमाणे रूंदीकरण झालेले नाही.

• सदर ठिकाणी डांबरीकरणाने रस्ता तयार होता. तथापि, वोडाफोन, एमएसईडीसी, गॅस लाईन्स, पाणी कनेक्शनसाठी इत्यादी सेवावाहिन्यांची कामे करीत असतांना रस्त्याची खोदाई करण्यात आली असल्याने रस्त्याच पृष्ठभाग खराब झाला होता.
• डांबरीकरणाचा रस्ता सतत खराब होत असल्याने या भागामध्ये पेव्हरब्लॉकने रस्ता तयार करण्यात आले असून यामुळे रस्ता खड्डेमुक्त होवून वाहतुक कोंडीची समस्या दूर झाली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांमधील मुलांच्या संख्येत मोठया प्रमाणात घट होत असल्याबाबत**

**(३५) १२२१३८ (२५-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांमधील मुलांच्या संख्येत मोठया प्रमाणात घट होत असल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मराठी शाळांमधील मुलांची संख्या वाढीच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) नागरी क्षेत्रामध्ये पालकांचा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये टाकण्याचा मोठ्या प्रमाणात वाढलेला कल पहाता, मराठी माध्यमाच्या शाळांमधील पटसंख्या कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.
(२) व (३) महानगरपालिकेच्या मराठी शाळांमधील मुलांची संख्या वाढावी यासाठी, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक, इतर शैक्षणिक साहित्य वाटप करणे तसेच लांब अंतरावरील विद्यार्थ्याकरिता मोफत बस सुविधा, सायकल बँक योजनेअंतर्गत सायकल उपलब्ध करुन देणे, यासाठी शिक्षकांच्या कार्यशाळेचे आयोजन करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) नव्याने बनविण्यात आलेल्या गटारांवरील झाकणांवर ठाणे आणि मुंबई महानगरपालिकेचा लोगो असल्याबाबत**

**(३६) १२२५०० (२९-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) नव्याने बनविण्यात आलेल्या गटारांवरील बसविण्यात आलेल्या झाकणांवर ठाणे आणि मुंबई महानगरपालिकेचा लोगो असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठेकेदाराकडून हा लोगो कॉंक्रीटने झाकण्याचा प्रयत्न सुरू असून नवीन फुटपाथवर केडीएमसीच्या लोगो असलेली झाकणं बसविणे प्राकलनात नमूद असतानाही या नियमांचे उल्लंघन ठेकेदाराकडून करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत डोंबिवली पूर्व मानपाडा रस्त्यावरील चिपळूणकर क्रॉस रोड ते चार रस्ता चौक (२०० मी.) रस्त्यालगत गटार व पदपथाचे काम पूर्ण करण्यात आले असून, रस्त्यालगत पदपथाचे काम व झाकणे बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले.
• ज्या कारखान्याकडे झाकणे बनविली जातात, त्या कारखान्याकडे मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली व इतर महानगरपालिकांचीही कामे असल्याने, कल्याण-डोंबिवली येथील गटारीवरील काही झाकणांवर ठाणे व मुंबई यांचा लोगो आढळून आला.
• सदर कामामध्ये ३ ते ४ झाकणांवरील लोगो कॉंक्रिटने झाकण्याचा प्रयत्न ठेकेदाराच्या मुकादमाकडून केला असल्याचे निदर्शनास येताच, तात्काळ काम थांबविण्यात आले.
• तसेच सदरचे ठेकेदारास इतर महानगरपालिकेचे लोगो असलेले सर्व कव्हर्स तातडीने काढून नवीन कव्हर्स/झाकणे आणून बसविण्याचे आदेशित केल्यानंतर, सदरहू ठेकेदाराने नव्याने झाकणे बसविण्याचे काम पूर्ण केले आहे.
• सदर कामाच्या प्राकलन/निविदेमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा लोगो असावा, असे ठेकेदारावर बंधनकारक अट नाही.
• सदर रहदारी असलेल्या पादचारी पदपथावर उघड्या/Missing झाकणामुळे कुठल्याही प्रकारचा अपघात होऊ नये, ही काळजी महानगरपालिकेमार्फत घेण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील महानगरपालिका रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३७) १२२६११ (२९-०७-२०१८). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील महानगरपालिका रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याने रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका करोडो रुपये खर्च करून सर्व सामान्यांसाठी रुग्णालये उभारते परंतु रुग्णालय सोई-सुविधांकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) • नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक रूग्णालय वाशी, नेरूळ व ऐरोली तसेच माता बाल रूग्णालय, बेलापूर व २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहेत.

• नवी मुंबई महानगरपालिकेअंतर्गत सार्वजनिक रूग्णालय वाशी हे पूर्ण क्षमतेने सुरू असून, सार्वजनिक रूग्णालय नेरूळ व ऐरोली येथील रूग्णालयात सद्यस्थितीत बालरोग व स्त्रीरोग विभाग पूण क्षमतेने कार्यान्वित आहेत.

• वाशी येथील रूग्णालय हे ३०० खाटाचे असून सदर रूग्णालयाअंतर्गत वैद्यकशास्त्र, प्रसुती व स्त्रीरोग, नवजात शिशु, बालरोग, त्वचारोग, क्षयरोग, मानसोपचार, भौतिकोपचार, प्रसूती पूर्व व प्रसूती पश्चात, लसीकरण, नेत्र चिकित्सा, अथिव्यंग, दंत चिकित्सा, कान नाक घसा चिकित्सा, सल्ला केंद्र, अतिदक्षता हृदरोग विभाग, ई.सी.जी. विभाग, अपघात विभाग, बाह्रूग्ण विभाग, लघू शस्त्रक्रिया विभाग, मोठी शस्त्रक्रिया विभाग या सोयी- सुविधा पुरविण्यात येत आहेत.

• सार्वजनिक रूग्णालय ऐरोली व नेरूळ येथे नेत्ररोग, अथिव्यंग, मानसोपचार, नाक नाक घसा, दंतरोग त्वचारोग, फिजिओथेरपि इत्यादी बाह्यरूग्ण सेवा सुरू करण्यात आलेल्या आहेत.

(३) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रूग्णालय ऐरोली, नेरूळ व माता बाल रूग्णालय बेलापूर करीता २८ प्रकारची रूग्णालयीन उपकरणे उपलब्ध करण्यात आलेली असून उर्वरित उपकरणांसाठी व आवश्यक मनुष्यबळ नियुक्ती करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पुर्व (जि.ठाणे) स्कायवॉकचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याबाबत**

**(३८) १२३१०६ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पुर्व (जि.ठाणे) येथील नागरीकांच्या सोयीसाठी कल्याण स्टेशन गणपती चौक ते सिध्दार्थनगर स्कायवॉक उभारणी सन २०११ पासून अतिशय संथ गतीने सुरू असल्याने पुर्व भागातील नागरीकांना अनेक गैरसोईना सामोरे जावे लागत असून माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान रात्रीच्या वेळी कल्याण पूर्वेतील श्री.विनोद सुर्वे नामक व्यक्तीची चोरीच्या उदेशाने हत्या करण्यात आली व तेथे लुटमारीचे प्रकार सुध्दा सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रातिनींधी रेल्वे प्राशासन एम.एम.आर.डी. ए. व महानगरपालिका प्राशासनाकडे सतत पाठपुरावा करून उक्त स्कायवॉक पुर्ण करण्याबाबत विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्कायवॉक पूर्ण करण्यास जाणिवपुर्वक विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच उक्त स्कायवॉक लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) • कल्याण पूर्व येथील स्कायवॉक १००% रेल्वे प्रशासनाचे जागेत असून प्रत्येक टप्प्यावर रेल्वे प्रशासनाची मान्यता घेवून करण्यात येत आहे.

• स्कायवॉक मधील टप्पा-१ अंतर्गत रेल्वे स्टेशन ते सिध्दार्थ नगर दरम्यानचा स्कायवॉक रेल्वे पादचारी पुलास दि. ०५.१०.२०१६ रोजी मंजूरी दिली.

• त्याअनुषंगाने काम पूर्ण करून सदर टप्पा-१ अंतर्गतचा स्कायवॉक दि.११.०१.२०१७ रोजी पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला असून, टप्पा-२ या कामाचा स्वतंत्र कार्यादेश दि. १६.०७.२०१५ रोजी देण्यात आलेला आहे.

• सदरचे काम प्रगतीपथावर असून दि. ११.०६.२०१८ रोजी रेल्वे प्रशासनाने सदर स्कायवॉक मध्ये रेल्वेच्या १२ मी. रूंद पादचारी पुलास जोडण्याचे कामास परवानगी दिलेली आहे.सदर पुलाचे विद्युतीकरण व इतर कामे पूर्ण झाल्यानंतर स्कायवॉक लवकरच नागरिकांसाठी खुला करण्यात येईल.

• सदर कामामध्ये महानगरपालिकेने नियुक्ती केलेल्या ठेकेदाराकडूनही अनावश्यक दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबत ठेकेदारास वेळोवेळी नोटीस देण्यात आल्या आहेत.

• तसेच या कामाबाबत ठेकेदारास लागू असलेली दरवाढ दि. ३०.०६.२०१७ पासून थांबविण्यात आलेली असून दि. ११.०५.२०१८ पासून रक्कम रू.३०००/- प्रतिदिन दंड आकारण्यात येत असल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टव्दारे सानपाडा (नवी मुंबई) येथे नियमांचे उल्लंघन करुन रुग्णालय चालविण्यात येत असल्याबाबत

**(३९) १२३२७६ (२९-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टद्वारे सानपाडा (पू) सेक्टर-७, प्लॉट नं.४ येथे रुग्णालय चालविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाची इमारत बांधतांना प्राथमिक नियमांचे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालय सुरु करण्यास लागणाऱ्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सानपाडा येथील सेक्टर ४, भूखंड क्र. ७ वर महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टमार्फत रूग्णालय चालविण्यात येत आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) • सदर प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेने नियमानुसार कार्यवाही करून दि. १६.०९.२०१५ बांधकाम परवानगी व दि.२८.०४.२०१७ रोजी भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे.
• सदर रूग्णालय सुरू करण्यास लागणाऱ्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अन्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रूग्णालयांची नोंदणी करण्यात येते.
• मे. महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट रूग्णालय, सानपाडा हे आरोग्य विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे नोंदणी क्र. ३१५ नुसार दि. ०९.०६.२०१७ रोजी नोंदणीकृत केले असून त्याची नोंदणी दि. ३१.०३.२०२० पर्यंत अधिकृत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेत आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांबाबत

**(४०) १२३३८९ (२५-०७-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेत मागील काही वर्षापासून आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असून महानगरपालिकेच्या विविध विभागात असलेल्या संगणक ऑपरेटर देण्याचे कंत्राट गॅलक्सी एजन्सीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका संबंधित एजन्सीला प्रती कर्मचारी १६ हजार रु. प्रमाणे देयके अदा करत असतांनाही सबंधित एजन्सी कर्मचाऱ्यांना रुपये ९ हजार पगार देते अशी तक्रार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सबंधित गॅलक्सी एजन्सीने कर्मचाऱ्यांचा पीएफ आणि ई.एस.आय चा भरणाही केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित एजन्सीने गत चार महिन्याचे कर्मचाऱ्यांचे वेतनही अदा केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सबंधित कंत्राटदार एजन्सीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलबांची कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

• औरंगाबाद महानगरपालिकेत विविध विभागांसाठी संगणक चालकांचा पुरवठा करण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

• या निविदा प्रक्रियेत पात्र ठरलेल्या गॅलक्सी मल्टीसर्व्हिसेस या एजन्सीला संगणक चालक पुरवठा करण्याचे कार्यादेश देण्यात आले.

• महानगरपालिकेने संबंधित एजन्सीला रु.१६५६२/- प्रमाणे निविदा मंजूर केलेली आहे. सदर रक्कम ही सर्व करांसहित असून त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन,पी.एफ., ईएसआय, जीएसटी व सर्व्हिस चार्जेस यांचा समावेश आहे.

• उपरोक्त सर्व रक्कम वजा जाता मूळ वेतन रु.९५००/- प्रति माहे वेतन संगणक चालकास देण्यात येते.

(३) व (४) • संबंधित एजन्सीने संगणक चालकांचा माहे एप्रिल,२०१८ पर्यंत पी.एफ. व ईएसआयचा भरणा केलेला आहे.

• महानगरपालिकेकडून संबंधित एजन्सीला माहे,एप्रिल,२०१८ पर्यंत वेतन अदा करण्यात आलेले असून त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल,२०१८ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलले आहे,ही वस्तुस्थिती आहे.

• माहे एप्रिल, २०१८ नंतरचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबईतील वरळी, नायगांव, दिलाईल रोड आणि शिवडीतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करण्याबाबत**

**(४१) १२३६६५ (२३-०७-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी, नायगांव, दिलाईल रोड येथील ना.म.जोशी मार्ग आणि शिवडीतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करण्याचे निकष शासनाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकषाचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम कधीपासून प्रत्यक्षात सुरु होणार आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०९-२०१८) :** (१) बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पातील लाभार्थींची पात्रता निश्चिती करण्यासाठी दि.२८.०६.२०१७ व दि.२४.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये आवश्यक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(२) वरील शासन निर्णयामध्ये बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पातील लाभार्थींकरीता पात्रतेचे निकष तसेच इतर निर्णय अंतर्भुत आहेत. नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरुंबाबत पात्रता निश्चितीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) नायगांव व ना. म. जोशी मार्ग, लोअरपरेल येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाकरीता म्हाडाकडून बांधकाम कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यातील प्रकल्प बांधकाम सुरु होण्याच्या दृष्टीने आवश्यक मंजुरी / परवानगी संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त झाली आहे. वरळी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाकरीता बांधकाम कंत्राटदारास दि.२१.०६.२०१८ रोजी म्हाडाद्वारे स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. तसेच शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता सदर जागा मुंबई बंदर न्यास यांच्या मालकीची असल्याने, सदर पुनर्विकासाबाबतचा "सर्वांगिण सुसाध्यता अहवाल" म्हाडाद्वारे मुंबई बंदर न्यास यांना सादर करण्यात आला आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेने वंश निमय इंन्फ्राप्रोजेक्ट आणि कनक रिसोर्सेस कंपनीकडील थकीत रक्कम वसूल करण्याबाबत**

**(४२) १२३७१४ (२६-०७-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने दहा वर्षापूर्वी कनक रिसोर्सेस या कचरा संकलनाची जबाबदारी सोपविलेल्या कपंनीकडे रूपये ३२ कोटी थकीत असून सदर रकम वसूल करण्यासाठी महानगरपालिका कोणतीच कार्यवाही करीत नसल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने शहरातील बस चालविण्याचे कंत्राट वंश निमय इंन्फ्राप्रोजेक्ट या कंपनीला दिले असता उक्त कंपनीनेसुध्दा महानगरपालिकेचे रुपये १३२ कोटी थकविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगरपालिका आर्थिक संकटात असतांनासुध्दा दोन्ही कंपन्यांकडे असलेले जवळपास रुपये १६४ कोटी वसूल करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करीत नसल्यामुळे अधिकारी व कंपन्यांचे संगनमत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच दोन्ही कंपन्यांकडील थकीत असलेले रुपये १६४ कोटी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

• संबंधीत कंपनीस अति प्रदान झालेल्या रकमेपैकी मे, २०१८ पर्यंत रु.१२.६७ कोटी रक्कम वसूल करण्यात आलेली असून, पुढील वसुली दरम्यान प्रकरण न्यायालयात गेले असून, सदर वसुलीस मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे व प्रकरण लवादापुढे ठेवण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

• मे.वंश निमय इन्फ्राप्रोजेक्ट या कंपनीकडून महानगरपालिकेला येणे असलेली रक्कम आणि कंपनीच्या दाव्यानुसार महानगरपालिकेकडून कंपनीस येणे असलेल्या रकमेबाबत करारातील अटी व शर्तीनुसार लवादाकडे प्रकरण सुरु आहे.

• लवादाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आयुक्त,नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) • मे कनक रिर्सोसेस मॅ.लि. या कंपनीस करण्यात आलेल्या अतिप्रदानाच्या रकमेच्यासंदर्भात, प्रथमदर्शनी जबाबदार असलेल्या आरोग्य अधिकाऱ्यास ऑगस्ट,२०१७ मध्ये निलंबित केले असून, त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी सुरु आहे.

• या प्रकरणातील संबंधीत कंपनी व नागपूर महानगरपालिका यांच्यातील करारानुसार, नागपूर महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार थकीत रकमांच्या वसुलीकरिता नागपूर महानगरपालिकेने कार्यवाही करुन आतापर्यंत रु.१२.६७ कोटी इतकी रक्कम वसूल केली असून, रु.७६ लक्ष इतकी रक्कम महानगरपालिकेने सुरक्षा ठेव म्हणून जमा आहे.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) शासन व जिल्हा नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत नगरपरिषदेचा मंजूर असलेला निधी परत गेल्याबाबत

**(४३) १२४१२५ (२६-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शासन व जिल्हा नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत नगरपरिषदेला करोडो रुपयांचा निधी मंजूर असतांना नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर करण्यात न आल्यामुळे सदरचा निधी परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी अंतर्गत शहरातील महत्वाची कामे प्रस्तावित असतांना प्रस्ताव सादर न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विलंब करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) • चिपळूण नगरपरिषदेकडून सन २०१७-१८ या वर्षामध्ये जिल्हा नगरोत्थान कार्यक्रम अतर्गत कोणतीही कामे प्रस्तावित करण्यात आलेली नव्हती.

• जिल्हा नियोजन कार्यालयाकडून चिपळूण नगरपरिषदेला माहे मार्च,२०१८ अखेर काही कामांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत पत्र आले होते.

• परंतु सदर पत्रातील प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके व ठराव पारीत नसल्यामुळे सदर कामांचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

---

**कोपरखैरणे (नवी मुंबई) येथे शाळेचे गेट कोसळून एका विद्यार्थ्याचा झालेला मृत्यु**

**(४४) १२४४३५ (३०-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरखैराणे (नवी मुंबई) येथील अनेक वर्षापासून बांधकाम प्रलंबित असलेल्या महानगरपालिका शाळेचे गेट कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यु व एक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत अवैध धंदे सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोपरखैराणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी दोषी असलेल्या ठेकेदार, कंत्राटदार, महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) • नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कोपरखैरणे येथे इंग्रजी माध्यमाची सीबीएसई शाळा दि. ०२.०३.२०१६ रोजी बांधून पूर्ण झालेली आहे.

• सदर शाळेचा वापर सद्यस्थितीत सुरू नसल्याने कोपरखैरणे व बोनकोड गावालगतच्या झोपडपट्टीतील मुले शाळेच्या संरक्षक भिंतीवरून चढून शाळेच्या आवारात झोपण्यास व खेळण्यासाठी येत असत ही वस्तुस्थिती आहे.

• तथापि तेथे अवैध धंदे सुरू असल्याची बाब खरी नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) शाळेचे गेट कोसळून मृत झालेल्या मुलाचे वडिल श्री. सुनिल आधार चौधरी यांनी दि. २५.०५.२०१८ रोजी FIR क्र. ०१३९/२०१८ अन्वये भा. दं. संहिता कलम ३०४ए, ३३६, ३३७, ३३८ व ३४ अन्वये नवी मुंबई महानगरपालिका व संबंधीत ठेकेदार यांचे विरूध्द कोपरखैरणे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केलेला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी प्रथमदर्शी दोषी कंत्राटदार मे. अश्विनी इन्फ्राडेव्हलपमेंटस प्रा. लि. व वास्तुविशारद मे. द. फर्म यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी श्री. अभय गावित, कनिष्ठ अभियंता व श्री.संतोष उनवणे, उप अभियंता यांना महानगरपालिकेने निलंबित करण्यात आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात अमृत योजनेअंतर्गत वृक्ष रोपणात झालेला गैरव्यहार**

**(४५) १२४४६२ (३०-०७-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात अमृत योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये महानगरपालिकेने एक कोटी रुपयांची झाडे लावली व पुढच्याच वर्षी यासाठी एक कोटी ६० लाख रुपये मंजूर झाले असून याच निधीतून सध्या झाडे लावली जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या आर्थिक वर्षात शहरामध्ये याच ठिकाणी दोन कोटी रुपये खर्च करुन झाडे लावण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१), (२), (३) व (४) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात कोल्हापूर शहरामध्ये हरित क्षेत्र विकास प्रकल्प राबविण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत.
• त्या अनुषंगाने सन २०१५-१६ करीता रु.१ कोटी, सन २०१६-१७ करिता रु.१.५० कोटी व सन २०१७-१८ करिता रु.२ कोटी किंमतीच्या हरित क्षेत्र प्रकल्पास शासनाने मान्यता दिलेली आहे.
• सन २०१५-१६ या वर्षामध्ये मंजुर प्रकल्पांतर्गत वृक्ष लागवड व हुतात्मा पार्क उद्यान विकसित करण्यात आले आहे.
• सन २०१६-१७ या वर्षाच्या प्रकल्पामधुन त्रिमुर्ती, टेंबलाई व मंगेशकरनगर या उद्यानांची कामे पुर्णत्वास गेली आहेत.
• सन २०१७-१८ या वर्षामध्ये मंजूर प्रकल्पातून रंकाळातलाव, सहयाद्रीनगर, टाकळा, घाटगेकॉलनी व फुलेवाडी येथील उद्यानांची कामे सुरु आहेत.

---

**परभणी महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत तसेच पूर्णवेळ आयुक्त व उपायुक्ताचे पद भरण्याबाबत**

**(४६) १२४५६१ (३०-०७-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी महानगरपालिकेतील कर्मचा-यांचे माहे फेब्रुवारी, २०१८ पासून वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेतील उपायुक्ताचे पद गत कांही महिन्यांपासून रिक्त असून पुर्णवेळ आयुक्तही नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत तसेच पूर्णवेळ आयुक्त व रिक्त असलेले उपायुक्ताचे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८)** : (१) महानगरपालिकेतील सफाई कर्मचा-यांचे वेतन माहे मे २०१८ पासून व इतर कर्मचा-यांचे वेतन माहे एप्रिल २०१८ पासून थकित आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • आयुक्त, परभणी महानगरपालिका या पदावर माहे जून २०१८ पासुन नियमित नियुक्ती करण्यात आलेली आहे.

• मंजूर दोन उपायुक्त पदांपैकी रिक्त असलेल्या एका पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबात महानगरपालिकेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

• महानगरपालिकेस प्राप्त होणा-या उत्पन्नातून कर्मचा-यांचे थकित वेतन अदा करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेत सफाई कर्मचारी कामावर अनुपस्थित असतानाही त्यांना वेतन देण्यात येत असल्याबाबत**

**(४७) १२५५६७ (३०-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेत ८००० सफाई कर्मचाऱ्यांमधील निम्मे कर्मचारी कामावर उपस्थित न राहता त्यांचे वेतन निघत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्‌नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१), (२) व (३) नागपूर महानगरपालिकेत सफाईच्या कामाकरिता ७७८७ सफाई कर्मचारी कार्यरत असून, त्यांना जीपीएस प्रणाली असलेली स्मार्ट घड्याळे हातावर बांधून काम करणे बंधनकारक केलेले असून, त्याआधारे नियमाप्रमाणे त्यांना वेतन देण्यात येत आहे.

आतापर्यंत या प्रकल्पातंर्गत ८०% नियमित सफाई कर्मचाऱ्यांना अशी घड्याळे पुरविण्यात आली असून, याबाबतचे उर्वरित कार्य प्रगतीपथावर आहे.

---

**केंद्र शासनाच्या "स्मार्ट सिटी" योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या शहरांबाबत**

**(४८) १२५६७२ (२६-०७-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या "स्मार्ट सिटी" योजनेमध्ये समावेश करण्यासाठी शासनाने कोणकोणत्या शहरांची शिफारस केली आहे,

(२) असल्यास, यापैकी कोणकोणत्या शहरांचा स्मार्ट सिटी योजनेत समावेश झाला आहे,

(३) असल्यास, उर्वरित शहरांचा समावेश न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, निवड झालेल्या शहरांमध्ये कोणकोणत्या योजनांसाठी केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) • केंद्र शासनाने "स्मार्ट सिटी" योजनेमध्ये समावेश करण्यासाठी राज्यांना प्रत्येकी १० शहरांची निवड करण्याचे सांगितले होते.

• राज्य शासनाने निवड प्रक्रियेव्दारे पुणे, सोलापूर, नाशिक, ठाणे, नागपूर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, पिंपरी-चिंचवड, अमरावती, मुंबई व नवी मुंबई अशा एकूण ११ शहरांची शिफारस केलेली होती.

(२) • केंद्र शासनाने स्मार्ट सिटी चॅलेंज अंतर्गत झालेल्या ५ फेऱ्यांमध्ये मिळून पहिल्या फेरीत पुणे व सोलापूर, दुसऱ्या फेरीत नाशिक, ठाणे, नागपूर, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद, व चौथ्या फेरीत पिंपरी-चिंचवड अशा एकूण ८ शहरांची स्मार्ट सिटी योजनेत निवड केली आहे.

(३) • उर्वरीत ३ शहरांपैकी मुंबई व नवी मुंबई शहरांनी सदर स्पर्धेमध्ये सहभाग घेतला नाही.

• अमरावती शहराने केंद्र शासन स्तरावर पार पडलेल्या स्मार्ट सिटी चॅलेंज स्पर्धेत सहभाग घेतला होता. तथापि, अमरावती शहराची अंतिमत: निवड होवू शकली नाही.

(४) • सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून निवड झालेल्या ८ शहरांकरीता स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत केंद्र शासन हिश्श्याचा एकूण रु.१३९८ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे.

---

## कल्याण पुर्व (जि.ठाणे) येथील 'ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत

**(४९) १२६३२३ (३०-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील कल्याण पुर्व येथील 'ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या मिळूनसुध्दा केवळ महानगरपालिकेने पुतळा उभारण्याची जागा हस्तांतरीत करून न घेतल्यामुळे पुतळा उभारणीच्या कामाला अद्याप सुरवात होऊ शकलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करूनही कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासन सदरची जागा हस्तांतरीत करण्यास टाळाटाळ करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा हस्तांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील कल्याण पूर्व येथील "ड" प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठीची जागा सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या मालकीची व ताब्यात नाही त्यामुळे पुतळा उभारणीच्या कामाला अद्याप सुरूवात होऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • सदरहू जागा हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात संपादीत करून घेण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत जमिन मालकांना नोटीस दिलेल्या आहेत.

• तथापि निश्चित जमिन मालकी हक्क सिध्द होत नसल्याने यामध्ये भूसंपादनास अडचण निर्माण होत आहे. सदर जमिनीबाबत सक्तीचे भूसंपादन करणेकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील मौजे नांदिवली येथील स.नं.८ व ९ हा ट्रान्सपोर्ट हबसाठी प्रस्तावित असल्याबाबत**

**(५०) १२६३३६ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील मौजे नांदिवली येथील स.नं.८ व ९ हा ट्रान्सपोर्ट हबसाठी प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात २० ते २५ वर्षापासुन काही गोरगरिब नागरीक वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जागेवर राहणाऱ्या गोरगरीब नागरीकांचे पुर्नवसन करण्याबाबत शासन स्तरावर कोणत्या उपयायोजना करण्यात आलेल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील २७ गावांकरीता शासनाने दि. ११.०३.२०१५ व दि. ०९.०५.२०१७ रोजी मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये मौजे नांदिवली येथील स. नं. ८ व ९ या जमिनीवर ट्रान्सपोर्ट हबसाठी आरक्षण प्रस्तावित नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.